PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Khichdi
Year: 1985

Song: Vajale Kiti Bagha
Lyricist: Jagdish Khebudkar

वाजले किती बघा
मला जायचयं घरला
नगं नगं नगं नगं
आहो वाजले किती बघा
मला जायचयं घरला
आई बाबा वरडतील बघा
मला जायचयं घरला
आहो वाजले किती बघा
मला जायचयं घरला
बांधावरन फिरू नको गं
पायात मोडंल काटा
आगं बांधावरन फिरू नको तू
पायात मोडंल काटा
काटयानं काटा काढीन मी
परं आईला जाऊन भेटा
आयला नगं नगं नगं नगं नगं
घे घे पदरात घे पदरात
घे पदरात साऱ्या चुका
हयो पदुर धरला ये हे...
आहो वाजले किती बघा
मला जायचयं घरला

काटयावरती काटा आलाया
नको वाजवू बारा
टिक टाक टिक टाक टिक टाक
अगगं काटयावरती काटा आलाया
नको वाजवू बारा
आहो भरबाराच्या उन्हामधी ह्या
कशी मी देईन थारा
बापरे नगं नगं नगं नगं नगं
नगं नगं तोंडाचा नगं तोंडाचा
नगं तोंडाचा फुगवू फुगा
ह्यो ह्यो आडोसा धरला
ये हे
आई बाबा वरडतील मला बघा
मला जायचयं घरला

रूप जवानी रूबाब नखरा
हाय हाय हाय हाये
ये हे रूप जवानी रूबाब नखरा
किती मी गानं गावं
परं गान गाता लगट कराया
जवळ कशाला यावं
जरा थांब
नगं नगं नगं नगं
काटा काटा सरसर काटा सरसर
काटा सरसर येतोय अंगा
मला जायचयं घरला
दोघं वरडून सांगू जगा
ह्यो हात तुझा धरला
दोघं वरडून सांगू जगा
ह्यो हात तुझा धरला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*